दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

खरी मैत्री म्हणजे सुखात टाळ्या वाजवणारी नव्हे, तर अडचणीत हात धरून उभी राहणारी. वेळ, स्वार्थ आणि अंतर बदललं तरी नात्याची उब जपणारी मैत्रीच खरं धन असतं.

## मुंबईचा वचपा ठाण्यात

**ठाणे** : शिवसेनेने मुंबईत महापौरपदाचा विषय ताणलेला असताना भाजपनं ठाण्यात महापौरपदाचा विषय काढला आहे. शिंदे यांना त्यांच्याच स्टाईलनं उत्तर देण्याची खेळी भाजपकडून केली जात आहे. मुंबईत भाजपच्या जागा अधिक असतानाही शिंदेसेनेनं मागणी केली. आता भाजपनं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात शिंदेसेनेचाच कित्ता गिरवला आहे. ठाण्यात शिंदेसेना मोठा पक्ष ठरलेला असतानाही भाजपनं महापौरपदाची मागणी केली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २० जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - ११८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### युएईचे अध्यक्ष अल नाहयान भारतात

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी दिल्ली विमानतळावर संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांचे स्वागत केले, यावरून भारत त्यांच्या भेटीला किती महत्त्व देतो हे दिसून येते. परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, अल नाह्यान दोन तासांपेक्षा कमी काळासाठी राजधानीत राहतील. इराण-अमेरिका संबंधांमध्ये तीव्र घसरण, येमेनवरून सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये वाढलेला तणाव आणि गाझामधील अस्थिर राजकीय परिस्थिती यामुळे मध्य-पूर्वेतील अस्थिर परिस्थिती निर्माण झाली असताना त्यांचा भारत दौरा आला आहे.

### झुला कोसळल्याने १४ मुले जखमी

**झाबुआ (मध्यप्रदेश) :** मध्य प्रदेशातील झाबुआ शहरातील एका जत्रेत सोमवारी एक महाकाय झूला अचानक तुटून कोसळल्याने एका आनंदी प्रवासाचे दुःस्वप्नात रूपांतर झाले, ज्यामध्ये १३ मुलींचा समावेश होता, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. झाबुआ येथील सरकारी उत्कृष्टता शाळेजवळ आयोजित 'महाराज नो मेलो' (महाराजांचा मेळा) येथील 'ड्रॅगन स्विंग' अचानक कोसळल्याचे जिल्हाधिकारी नेहा मीणा यांनी पत्रकारांना सांगितले.

### आयटीबीपीच्या प्रमुखपदी कपूर

**नवी दिल्ली :** हरियाणाचे माजी पोलिस महासंचालक शत्रुजीत कपूर यांनी सोमवारी भारत-चीन एलएसीचे रक्षण करणारे केंद्रीय दल इंडो-तिबेटीयन बॉर्डर पोलिसांचे नवे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. १९९० च्या बॅचचे भारतीय पोलिस सेवा अधिकारी असलेले कपूर यांनी सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) प्रमुखपदी नुकतीच नियुक्ती झालेले विद्यमान महासंचालक (डीजी) प्रवीण कुमार यांच्याकडून पारंपारिक पदभार स्वीकारला.

### वगळलेली नावांची यादी जाहीर करण्याचे न्यायालयाचे निर्देश

# मतदाराच्या हक्कांचे बंगालमध्ये संरक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मतदार यादीतून एखाद्या नागरिकाचे नाव वगळण्यात आले असल्यास त्याची स्वतंत्र आणि स्पष्ट यादी जाहीर करावी, असा ठाम आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार यादीच्या 'स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन' (एसआयआर) प्रक्रियेवर सुनावणी करताना न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत आयोगाला मोठा धक्का दिला.

मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने 'तार्किक गडबड' या कारणावरून आक्षेप घेण्यात आलेल्या तब्बल १.२५ कोटी मतदारांची संपूर्ण यादी सार्वजनिक करण्याचे निर्देश दिले. कागदपत्रांच्या पडताळणीसाठी जवळपास दोन कोटी नागरिकांना नोटिसा पाठवण्यात आल्या असून त्यातील मोठा हिस्सा 'लॉजिकल डिस्क्रिपन्सी' या श्रेणीत टाकण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने स्पष्ट केले की ज्या मतदारांच्या नावात किंवा तपशिलात गडबड असल्याचे सांगितले जात आहे. उदा. वडिलांच्या नावातील चूक, आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या वयातील कथित विसंगती अशा सर्वांची यादी ग्रामपंचायत, ब्लॉक कार्यालये आणि वॉर्ड कार्यालयांमध्ये ठळकपणे लावली जावी. ही यादी जाहीर झाल्यानंतर नागरिकांना दहा दिवसांची मुदत देऊन हरकती नोंदवण्याची संधी देणे बंधनकारक असेल. कागदपत्रे अपुरी असल्यास संबंधित मतदाराला नवीन कागदपत्रे सादर करून आपली बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार असेल. तसेच, अधिकाऱ्यांनी जमा केलेल्या कागदपत्रांची पावती देणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. एखाद्याचे नाव अंतिमतः मतदार यादीतून वगळायचे ठरल्यास, त्यामागचे कारण लेखी स्वरूपात देणे अनिवार्य करण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाच्या कामकाज पद्धतीवर न्यायालयाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. आयोग अधिकृत लेखी परिपत्रकाऐवजी व्हॉट्सअॅपवरून सूचना पाठवत असल्याचे समोर आल्यानंतर मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्टपणे सुनावले, व्हॉट्सअॅपवरून देश चालत नाही. संवेदनशील प्रक्रियेसाठी योग्य, औपचारिक आणि लेखी सर्क्युलर आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाच्या वतीने ज्येष्ठ वकील राकेश द्विवेदी यांनी काही प्रकरणांत आई आणि मुलामधील वयाचा फरक केवळ १५ वर्षांचा असल्याचे उदाहरण देत ते 'तार्किक गडबड' असल्याचे सांगितले. यावर न्यायमूर्ती बागची यांनी टोला लगावत, "आई आणि मुलामधील १५ वर्षांचा फरक लॉजिकल गडबड कसा ठरू शकतो? आपण अशा देशात राहतो जिथे बालविवाहाची वास्तवता नाकारता येत नाही," असे स्पष्ट केले.

दरम्यान, ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी आडनावांच्या स्पेलिंगमधील फरकांकडे लक्ष वेधले. पश्चिम बंगालमध्ये 'गांगुली', 'दत्ता' यांसारख्या आडनावांचे वेगवेगळे स्पेलिंग प्रचलित असून, केवळ स्पेलिंगच्या आधारे मतदाराचे नाव कापणे ही गंभीर चूक असल्याचे त्यांनी सांगितले.

न्यायालयाला हेही सांगण्यात आले की नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेन यांनाही नोटीस पाठवण्यात आली आहे. निवडणूक आयोग यांत्रिक पद्धतीने निर्णय घेत असल्याने गंभीर तांत्रिक चुका होत असल्याचा आरोपही करण्यात आला.

## भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नबीन बिनविरोध



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भाजपने ४५ वर्षीय नितीन नबीन यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड केली. या निवडीमुळे भाजपच्या सर्वोच्च पदावर पोहोचणारे ते सर्वात तरुण नेते ठरले आहेत.

बिहारमधून पाच वेळा आमदार राहिलेले नितीन नबीन सध्या बिहार सरकारमध्ये कायदा व न्याय, शहरी विकास आणि गृहनिर्माण मंत्री म्हणून कार्यरत आहेत. १४ डिसेंबर रोजी त्यांची भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. २०२० पासून पक्षाचे नेतृत्व करणाऱ्या जे. पी. नड्डा यांच्या जागी नबीन मंगळवारी औपचारिकपणे राष्ट्रीय अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींसह माजी अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी यांसारख्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी नितीन नबीन यांच्या उमेदवारीचे प्रस्तावक म्हणून भूमिका बजावली. निवड प्रक्रियेदरम्यान निर्मला सीतारामन, किरेन रिजिजू, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, नायब सैनी, प्रमोद सावंत, पेमा खांडू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## कल्याण-डोंबिवलीत फोडाफोडीची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कल्याण :** महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर कल्याण-डोंबिवलीतील राजकारण तापू लागले असून, शिवसेनेत पुन्हा एकदा फोडाफोडीची शक्यता चर्चेत आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्धव ठाकरे गटाला धक्का देण्याच्या तयारीत असल्याची चर्चा असताना, ठाकरे गटाकडून निवडून आलेले दोन नगरसेवक शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे कल्याण-डोंबिवली जिल्हा प्रमुख शरद पाटील यांनी संबंधित नगरसेवकांना थेट नोटीस बजावली आहे. मधुर म्हात्रे आणि किर्ती ढोणे या दोन्ही नगरसेवकांना मंगळवारी होणाऱ्या गट स्थापन बैठकीला उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बैठकीला गैरहजर राहिल्यास पक्षविरोधी कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही नोटीसमध्ये देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, दोन्ही नगरसेवक त्यांच्या घरी उपस्थित नसल्यामुळे ही नोटीस मधुर म्हात्रे यांच्या वडिलांना आणि किर्ती ढोणे यांच्या बहिणीला देण्यात आली. त्यामुळे या दोन्ही नगरसेवकांचे नेमके ठिकाण काय आणि ते कुणाच्या संपर्कात आहेत, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

दरम्यान, संभाव्य फोडाफोड टाळण्यासाठी ठाकरे गटाने आपल्या नऊ नगरसेवकांना, तर मनसेने सात नगरसेवकांना अज्ञातस्थळी ठेवले असल्याची माहिती आहे. कल्याण-डोंबिवलीत ठाकरे गटाचे एकूण ११ नगरसेवक निवडून आले असून, त्यापैकी नऊ नगरसेवक सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहेत.

### जनमताचा आदर करू : एकनाथ शिंदे यांचा दावा

# मुंबईचा महापौर महायुतीचाच होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** महापालिका निवडणुकीत मुंबईकरांनी महायुतीला स्पष्ट पसंती दिली असून या जनमताचा पूर्ण आदर केला जाईल. त्यामुळे मुंबईत महायुतीचाच महापौर होईल, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. विरोधकांकडून जाणीवपूर्वक अफवा पसरवल्या जात असून नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मुंबईचा महापौर शिवसेनेचाच असावा, ही कार्यकर्त्यांची भावना असू शकते, असे सांगत शिंदे यांनी महायुतीत कोणताही संभ्रम नसल्याचे स्पष्ट केले. मुंबईतील महापौरपदावरून शिवसेना आणि भाजपमध्ये तणाव असल्याच्या चर्चांना त्यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, "२०१९ मध्ये जनमताचा अनादर करत वेगळी सत्ता स्थापन करण्यात आली होती. मात्र आम्ही तसं करणार नाही. आम्ही जनमताचा सन्मान करतो. बाळासाहेबांचा आशीर्वाद आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीने ही निवडणूक लढवली आहे. जिथे जिथे आम्ही महायुतीत एकत्र लढलो, तिथे तिथे महायुतीचाच महापौर निवडून येईल."

ठाणे आणि कल्याणमध्ये अडीच-अडीच वर्षे महापौरपद वाटून घेण्याच्या चर्चांबाबत बोलताना शिंदे यांनी या सर्व अफवा असल्याचे सांगितले. "आमची लढाई सत्ता किंवा खुर्चीसाठी नाही, तर मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. मुंबईकरांना पुढील पाच वर्षांत काय देणार आहोत, यावर आमचे लक्ष आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांना मुंबईतील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये ठेवण्यात आल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. याबाबत बोलताना शिंदे म्हणाले की, पक्षाची बैठक घेऊन नगरसेवकांना पुढील पाच वर्षांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. हे सर्व संघटनात्मक कामकाजाचा भाग असून त्यामागे अन्य कोणताही हेतू नाही.

शिंदे यांच्या शिवसेनेचा महापालिकेतील स्वतंत्र गट तातडीने स्थापन केला जाणार असून त्यासाठीची कागदोपत्री प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. गटनेत्यांच्या शर्यतीत यामिनी जाधव, तृष्णा विश्वासराव यांच्यासह अमेय घोले यांच्यासारख्या तरुण आणि अनुभवी नगरसेवकांची नावे चर्चेत आहेत. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गट स्थापन केल्यास नगरसेवक फुटीचा धोका टाळता येईल, या दृष्टीने शिवसेनेत हालचालींना वेग आला आहे.

## रशिया-युक्रेन युद्धात भारत निवडक लक्ष्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी रशिया-युक्रेन युद्धावरील भारताच्या भूमिकेवरून भारताला केलेल्या निवडक लक्ष्यीकरणावर टीका केली. "गेल्या सप्टेंबरमध्ये न्यू यॉर्कमध्ये आणि जानेवारीत पॅरिसमध्ये मी युक्रेन संघर्षाबाबत आमचे विचार मांडले आहेत. त्यावेळी मी वारंवार स्पष्ट केले आहे की भारतावर निवडक लक्ष्य करणे अन्याय्य आहे. आजही मी हेच पुन्हा सांगतो," असे जयशंकर यांनी म्हटले.

ही प्रतिक्रिया त्यांनी पोलंडचे उपपंतप्रधान व परराष्ट्र व्यवहार मंत्री राडोस्लाव सिकोर्स्की यांच्यासोबत प्रतिनिधीमंडळ पातळीवरील चर्चेदरम्यान दिली. जागतिक उलथापालथाच्या पार्श्वभूमीवर भारत-पोलंडमधील संबंध अधिक घट्ट करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

सिकोर्स्की यांनी अमेरिकेने लादलेल्या टॅरिफमुळे जागतिक व्यापारात निर्माण झालेल्या अस्थिरतेबाबतही चिंता व्यक्त केली. "टॅरिफद्वारे निवडक लक्ष्यीकरणाचा अन्याय्य परिणाम होतो. भारत युरोपियन युनियनसोबत गुंतलेले राहावे, हे आम्ही आशा करतो. तुमचे युरोपभर दूतावास स्थापन करणे गंभीर भूमिका दर्शवते," असे सिकोर्स्की म्हणाले.

जयशंकर यांनी पोलंडला शेजारील भागातील दहशतवादी पायाभूत सुविधा चालना देऊ नये आणि दहशतवादाबाबत शून्य सहनशीलता राखावी, असे आवाहन केले. या मुद्द्यावर सिकोर्स्की यांनी सहमती दर्शवत सीमापार दहशतवादाविरुद्ध पोलंडने घेतलेली भूमिका आणि अलीकडील पोलिश रेल्वे लाईनवरील हल्ल्याचा उल्लेख केला.

यावेळी ट्रम्प प्रशासनाने रशियाकडून तेल खरेदीवर भारतावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफबाबतही चर्चा झाली. तथापि, पोलंड व इटली या यादीत नव्हते. सिकोर्स्की यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये पाकिस्तान दौऱ्याबाबतही माहिती दिली आणि द्विपक्षीय चर्चा झाल्याचे सांगितले. जयशंकर यांचे हे स्पष्ट विधान भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा आणि जागतिक व्यापार, सुरक्षा व दहशतवादाबाबतच्या जबाबदाऱ्यांवर केंद्रित असल्याचे अधोरेखित करते.

## जमिनीखालून आवाज पंढरपूरात संभ्रम

**पंढरपूर :** विठुरायाच्या पंढरपूर नगरीत सोमवारी सकाळपासून दोन वेळा गूढ आवाज ऐकू आल्याने खळबळ उडाली आहे. अचानक झालेल्या मोठ्या आवाजामुळे काही ठिकाणी घरांच्या काचा फुटल्या असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी सकाळी सुमारे १० वाजून १५ मिनिटांनी पहिल्यांदा भूगर्भातून मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकून अनेक नागरिक घराबाहेर आले. भूकंपाचा धक्का तर नाही ना, अशी भीती सर्वत्र पसरली. दुपारी सुमारे २ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा एकदा गूढ आवाज ऐकू आला. यावेळी आवाजाची तीव्रता अधिक असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## केवळ अपमानास्पद भाषा वापरणे गुन्हा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केवळ अपमानास्पद भाषा वापरणे हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा ठरू शकत नाही. जोपर्यंत संबंधित व्यक्तीचा अपमान करण्यामागे तिची जात हे कारण नसते किंवा तिला जातीवरून कमी लेखण्याचा हेतू नसतो, तोपर्यंत केवळ अपमानास्पद शब्द वापरले म्हणून हा कायदा लागू होत नाही असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने दिला.

संबंधित प्रकरणात एफआयआर किंवा दोषारोपपत्रात आरोपीने जातीवाचक शिवीगाळ केल्याचा किंवा जातीवरून अपमान केल्याचा कोणताही ठोस उल्लेख नसतानाही ही कारवाई सुरू ठेवण्यात आली होती. या प्रकरणी सत्र न्यायालय आणि उच्च न्यायालयाने चूक केली, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले. बिहारमधील एका अंगणवाडी केंद्रात शिवीगाळ आणि मारहाण केल्याचा आरोप होता. संबंधितावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी पाटणा उच्च न्यायालयाने आरोपीने दाखल केलेली याचिका फेटाळली होती. याविरोधात संबंधिताने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. शाजन स्कारिया विरुद्ध केरळ राज्य या अलीकडील खटल्याचा संदर्भ देत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने दोन अटी स्पष्ट केल्या. पहिली अट की, तक्रारदार व्यक्ती अनुसूचित जाती किंवा जमातीची असणे आवश्यक आहे. दुसरी अट, झालेला अपमान किंवा धमकी ही केवळ ती व्यक्ती 'त्या' विशिष्ट जातीची आहे याच कारणावरून दिलेली असावी.

खंडपीठाने स्पष्ट केले की, केवळ तक्रारदार मागासवर्गीय आहे म्हणून हा गुन्हा सिद्ध होत नाही, तर अपमान करण्यामागे त्या व्यक्तीला जातीवरून काली दाखवण्याचा हेतू असणे अनिवार्य आहे. या निरीक्षणासह सर्वोच्च न्यायालयाने पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला असून संबंधित आरोपीविरुद्धची फौजदारी कारवाई रद्द केली आहे.

### नदी खोऱ्यांतील बर्फवृष्टी क्षेत्र १२.७२ टक्क्यांनी घटले

# हिमाचल प्रदेशामध्ये बर्फ होतोय चिंताजनक कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशात बर्फाचे आवरण सातत्याने कमी होत असल्याचे चिंताजनक चित्र समोर आले आहे. २०२३-२४ या कालावधीत चिनाब, बियास, रावी आणि सतलज या चार प्रमुख नद्यांच्या खोऱ्यांतील एकूण बर्फवृष्टी क्षेत्र १७,४३७.४ चौरस किलोमीटरपर्यंत घसरले आहे. हे क्षेत्र २०२२-२३ च्या हिवाळ्याच्या तुलनेत तब्बल १२.७२ टक्क्यांनी कमी असल्याचे हिमाचल प्रदेश स्टेट सेंटर ऑन क्लायमेट चेंजच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. पर्यावरणवादी या स्थितीला आता 'हिम दुष्काळ' असे संबोधत आहेत.

हा अभ्यास अॅडव्हान्स्ड वाइड फील्ड सेन्सर उपग्रह डेटाच्या आधारे चारही नदी खोऱ्यांचे मॅपिंग करून करण्यात आला आहे. आकडेवारीनुसार २०१८-१९ मध्ये बर्फाचे आच्छादन २०,२१० चौरस किमी होते, तर २०१९-२० मध्ये ते वाढून २३,५४२ चौरस किमीपर्यंत गेले. २०२०-२१ मध्ये पुन्हा घट होऊन १९,१८३ चौरस किमी इतके क्षेत्र बर्फाखाली होते. २०२१-२२ मध्ये मात्र बर्फाचे क्षेत्र वाढून २३,२४४ चौरस किमी नोंदवले गेले.

२०२२-२३ च्या हिवाळ्यात चारही खोऱ्यांमध्ये मिळून १९,९७९ चौरस किमी क्षेत्र बर्फाने झाकलेले होते. त्यामध्ये सतलज खोऱ्यात सर्वाधिक ८,८६८ चौरस किमी, चिनाबमध्ये ७,०४९.६७ चौरस किमी, बियासमध्ये २,१७४ चौरस किमी आणि रावी खोऱ्यात १,८८६ चौरस किमी बर्फाचे आच्छादन होते. मात्र २०२३-२४ मध्ये हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे.

अहवालानुसार २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर ते जानेवारीदरम्यान बहुतांश खोऱ्यांमध्ये नकारात्मक बर्फ आच्छादन नोंदवले गेले. फेब्रुवारी ते एप्रिलदरम्यान काही प्रमाणात सुधारणा दिसली, मात्र हिवाळ्याच्या एकूण कालावधीत बर्फवृष्टी समाधानकारक ठरलेली नाही. वाढते हिवाळी तापमान, पर्जन्यमानातील बदल आणि तीव्र हवामान घटनांची वाढती वारंवारता हे हवामान बदलाचे स्पष्ट परिणाम असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या दोन दशकांत शिमला आणि मनाली येथे सरासरी बर्फवृष्टीत मोठी घट झाली असून, यंदाच्या हिवाळ्यात आतापर्यंत या पर्यटनस्थळांवर बर्फवृष्टी झालेली नाही. कुल्लू, लाहौल-स्पिती आणि किन्नौरसारख्या उंच भागांतही पूर्वीसारखी बर्फवृष्टी होत नसल्याचे चित्र आहे. पर्यावरणवादी गुमान सिंह यांनी या स्थितीस हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, वाढते हरितगृह वायू उत्सर्जन, रस्ता रुंदीकरण, जलविद्युत प्रकल्प आणि मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड जबाबदार असल्याचे सांगितले.

दरम्यान, हवामान विभागाने २० जानेवारीपर्यंत काही जिल्ह्यांसाठी थंडीच्या लाटेचा पिवळा इशारा दिला असून, २३ जानेवारी रोजी उंच भागात जोरदार पाऊस व हिमवृष्टीची शक्यता वर्तवली आहे. तथापि, दीर्घकालीन दृष्टीने हिमालयीन शेती, जलस्रोत आणि जैवविविधतेवर होणारे परिणाम रोखण्यासाठी तातडीने एकात्मिक हवामान अनुकूलन उपाय आणि शाश्वत धोरणांची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## थंडीचा कडाका पुन्हा वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** नववर्षाच्या प्रारंभी झालेल्या अवकाळी पावसानंतर राज्यातील हवामान सतत बदलत होत आहे. आता पुन्हा एकदा राज्यात थंडी वाढली असून पुढचे काही दिवस थंडीचा कडाका वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात किमान तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता असून पुढील काही दिवस पहाटे आणि रात्री कडाक्याची थंडी जाणवू शकते.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत किमान तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. कोकण पट्ट्यात हवामान मुख्यतः स्वच्छ ते अंशतः ढगाळ राहणार आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह पालघर आणि रायगड जिल्ह्यांत पावसाची शक्यता नाही. या भागांत कमाल तापमान ३० ते ३२ अंशांच्या दरम्यान, तर किमान तापमान १८ ते २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहील.

सकाळच्या वेळेत काही ठिकाणी हलके धुके पडण्याची शक्यता असून त्याचा परिणाम दृश्यमानतेवर होऊ शकतो. समुद्रकिनारी थंड वारे वाहतील मात्र तीव्र थंडी जाणवणार नाही. पश्चिम महाराष्ट्रात दिवस आणि रात्रीच्या तापमानात फरक कायम राहणार आहे. विदर्भात मात्र थंडीची लाट अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि वर्धा परिसरात किमान तापमान ८ ते १२ अंशांपर्यंत घसरण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सकाळच्या वेळेत तीव्र गारठा जाणवू शकतो, ज्याचा थेट परिणाम हा आरोग्यावर होण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

# भारताचे संयमी आणि प्रभावी परराष्ट्र धोरण



**जागतिक राजकारण अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभे असताना, अमेरिकेच्या भूमिकेमुळे तणाव वाढीस लागला आहे. अशा वेळी भारताची संयत, कमी बोलकी भूमिका अनेकांना भारताचे मौन वाटते. मात्र हे मौन म्हणजेच भारताचे परराष्ट्र धोरण आहे.**

आज जग अस्वस्थ आहे. युक्रेन युद्ध, गाझा संघर्ष, लाल समुद्रातील तणाव, चीन-तैवान प्रश्न, आणि त्यातच अमेरिकेच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणातील अस्थिरता या सगळ्या घटकांमुळे जागतिक राजकारण ढवळून निघाले आहे. या गदारोळात भारताची भूमिका मात्र तुलनेने शांत, संयमित आणि काहींच्या मते संशयास्पदरीत्या मौनाची वाटते. विशेषतः अमेरिकेच्या भूमिकेमुळे निर्माण झालेल्या भूराजकीय उलथापालथींवर भारताने ठाम शब्दांत प्रतिक्रिया न दिल्याने हा प्रश्न अधिक ठळकपणे उपस्थित केला जात आहे. अमेरिका आज महासत्ता म्हणून नव्हे, तर अस्थिरतेचा एक केंद्रबिंदू म्हणूनही ओळखली जात आहे. व्यापार निर्बंध, टॅरिफ युद्धे, मित्रदेशांवर वाढता दबाव, तसेच आंतरराष्ट्रीय संघर्षांतील एकतर्फी भूमिका यामुळे जागतिक समीकरणे बदलत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने उघड भूमिका घ्यावी, अमेरिकेच्या काही धोरणांवर स्पष्ट टीका करावी, अशी अपेक्षा अनेकांकडून व्यक्त होते. मात्र भारताची परराष्ट्र नीती केवळ नैतिक घोषणांवर आधारलेली नसून, ती हितसंबंधांच्या सूक्ष्म गणितावर उभी आहे, हे विसरता कामा नये. भारताची आजची भूमिका समजून घ्यायची असेल, तर 'मौन' आणि 'संयम' यातील फरक ओळखावा लागेल. भारताने अनेक आंतरराष्ट्रीय घडामोडींवर आपली भूमिका मांडलेली आहे, पण ती आक्रमक शब्दांत नाही. संयुक्त राष्ट्रांत भारत सार्वभौमत्व, आंतरराष्ट्रीय कायदा आणि शांततामय तोडगा यांचीच पुनरावृत्ती करत आला आहे. हे शब्द काहींना सपाट, तर काहींना पळवाटीचे वाटू शकतात. मात्र बदलत्या जागतिक वास्तवात हीच भूमिका भारताला रणनीतिक स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यास मदत करते. अमेरिकेशी भारताचे संबंध आज बहुआयामी आहेत. संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार, परदेशी गुंतवणूक आणि चीनविरोधी संतुलन या सगळ्या बाबतीत अमेरिका महत्त्वाची आहे. अशा वेळी अमेरिकेच्या प्रत्येक वादग्रस्त निर्णयावर सार्वजनिकपणे टीका करणे म्हणजे या संबंधांमध्ये अनावश्यक ताण निर्माण करणे ठरेल. परराष्ट्र धोरण हे व्यासपीठावर भाषण देण्यापुरते नसते; अनेकदा न बोलण्यातही अर्थ असतो. याचा अर्थ भारत मूल्याधिष्ठित भूमिकेला सोडून देतो आहे, असा होत नाही. भारताने इतर देशांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करण्याची भूमिका सातत्याने घेतली आहे. ही भूमिका आज अमेरिकेच्या बाबतीतही लागू केली जात आहे. जे देश स्वतः लोकशाही, मानवाधिकार आणि आंतरराष्ट्रीय नियमांचा पुरस्कार करतात, त्यांच्याच कृती त्या निकषांवर तपासल्या जाणे अपेक्षित असते. पण भारताने हा न्यायाधीशाचा आव न आणता, आपल्या दीर्घकालीन हिताला प्राधान्य दिले आहे. ईराण, पश्चिम आशिया किंवा लॅटिन अमेरिकेतील घडामोडींकडे पाहिले, तर भारताने काळजीपूर्वक अंतर राखलेले दिसते. भारतीय नागरिकांची सुरक्षितता, ऊर्जा गरजा, व्यापार मार्ग आणि प्रादेशिक स्थैर्य या मुद्द्यांवर भारताने प्रत्यक्ष कृती केली आहे. सार्वजनिक टीका न करता प्रत्यक्ष उपाययोजना करणे, ही भारताची निवड आहे. ही निवड कदाचित कमी आकर्षक वाटेल, पण ती वास्तववादी आहे. आजच्या बहुध्रुवीय जगात कोणत्याही एका गटाशी पूर्णपणे बांधील राहणे धोकादायक ठरू शकते. अमेरिका, रशिया, युरोप, चीन या सगळ्यांशी समतोल राखत पुढे जाणे, ही भारताची गरज आहे. अशा वेळी शब्द जपून वापरणे, प्रतिक्रिया मोजून देणे आणि कधी मौन पाळणे, हेही धोरणाचाच भाग ठरते. भारताची आजची परराष्ट्र भूमिका ही गोंधळलेली किंवा दिशाहीन नाही, तर ती सावध, मोजकी आणि स्वार्थाधारित आहे. जगातील अस्थिरतेत उगाच नैतिक आघाडी घेणे सोपे असते, पण त्याचे परिणाम भोगावे लागतात. भारताने सध्या तरी हा धोका पत्करलेला नाही. त्यामुळे दिसणारे मौन हे निष्क्रियतेचे लक्षण नसून, ते एका गणिती शांततेचे प्रतीक आहे. प्रश्न एवढाच आहे की ही शांतता योग्य वेळी बोलण्यात बदलेल का. कारण अखेरीस, मौनही कायम राहू शकत नाही.

# सरकारच्या सुधारणांची खरी कसोटी

**सुधारणांच्या नावाखाली अर्थव्यवस्था पुढे जात असल्याचे चित्र रंगवले जात असताना, कृषी सबसिडीचा प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित राहतो. अन्न व खत सबसिडीची रचना शेतकरी, बाजार आणि सरकार अशा तिन्ही पातळ्यांवर विसंगती निर्माण करणारी...**



देशाची अर्थव्यवस्था सध्या 'सुधारणांच्या मार्गावर' असल्याचे चित्र सातत्याने रंगवले जाते. जीएसटी, डिजिटल व्यवहार, पायाभूत सुविधांवरील खर्च, उत्पादनाधारित प्रोत्साहन योजना या सगळ्यांमुळे भारताची गती वेगवान झाली आहे, असा सरकारचा दावा आहे. आकडेवारीही काही अंशी तेच सांगते. मात्र या झगमगाटाच्या मागे एक क्षेत्र आजही जुन्याच चाकोरीत अडकलेले आहे आणि ते म्हणजे कृषी आणि त्याला दिल्या जाणाऱ्या सबसिडी.

शेती हा केवळ आर्थिक विषय नाही; तो राजकीय, सामाजिक आणि भावनिक मुद्दाही आहे. त्यामुळेच शेतीशी संबंधित कोणत्याही सुधारणांकडे सरकारे फार काळजीपूर्वक पाहतात. पण हीच काळजी कधी कधी सुधारणांना अडथळा ठरते. आज भारतातील कृषी सबसिडी व्यवस्था त्याचेच उत्तम उदाहरण आहे.

सध्याच्या परिस्थितीत शेती क्षेत्राची वाढ मर्यादित राहिली आहे. अन्नधान्याच्या किमती काही प्रमाणात घसरल्यामुळे ग्राहकांसाठी महागाई आटोक्यात आली असली, तरी त्याची थेट झळ शेतकऱ्यांना बसली आहे. कांदा, बटाटा, डाळी यांसारख्या पिकांना अनेक ठिकाणी उत्पादन खर्चही निघत नाही. म्हणजेच ग्राहक सुखावतो आहे, पण उत्पादक अडचणीत सापडतो आहे. ही विसंगती दीर्घकाळ चालू शकत नाही. या पार्श्वभूमीवर कृषी सबसिडीकडे पाहणे अपरिहार्य ठरते. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात अन्न आणि खत सबसिडीवर प्रचंड खर्च होतो. हा खर्च इतका मोठा आहे की तो अनेक विकासात्मक योजनांच्या एकूण बजेटपेक्षाही जास्त ठरतो. प्रश्न असा नाही की सबसिडी द्यावी की नाही; प्रश्न आहे ती कशी, कुणाला आणि किती काळासाठी द्यावी.

सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) हे याचे ठळक उदाहरण. सध्या देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्येला स्वस्त किंवा मोफत धान्य दिले जाते. ही योजना कोविड काळात गरजेची होती, याबाबत दुमत नाही. पण आज अर्थव्यवस्था सावरत असताना, दारिद्र्याचे प्रमाण घटत असताना, इतक्या मोठ्या लोकसंख्येला कायमस्वरूपी मोफत धान्य देणे योग्य आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. खऱ्या अर्थाने अतिगरीब आणि असुरक्षित घटकांपर्यंत मदत पोहोचवण्याऐवजी ही योजना 'सर्वांसाठी सर्व काही' अशी होत चालली आहे. यामुळे दोन परिणाम होतात. एक म्हणजे सरकारवर प्रचंड आर्थिक ताण येतो. आणि दुसरे म्हणजे ज्यांना खरोखर गरज आहे, त्यांच्यापर्यंत मदत पोहोचण्याची धार कमी होते. लोकसत्तेच्या भाषेत सांगायचे तर, ही व्यवस्था 'कल्याणकारी'पेक्षा 'लोकानुनयी' अधिक बनली आहे.

खत सबसिडीची कथा तर आणखी गुंतागुंतीची आहे. युरियाला दिली जाणारी भरघोस सबसिडी शेतीसाठी फायदेशीर वाटत असली, तरी तिचे दीर्घकालीन परिणाम घातक आहेत. स्वस्त युरियामुळे नायट्रोजनचा अतिवापर होतो, जमिनीचा पोत बिघडतो, पाणी प्रदूषित होते आणि शेतीचा नैसर्गिक समतोल ढासळतो. फॉस्फरस आणि पोटॅशसारख्या अन्य पोषक घटकांकडे दुर्लक्ष होते. म्हणजेच सबसिडी शेतीला वाचवत नाही, तर हळूहळू तिचे नुकसान करते.

या सगळ्या पार्श्वभूमीवर एक स्पष्ट भूमिका आहे. सुधारणा करायच्या असतील, तर सबसिडीचे तर्कशुद्धीकरण करावेच लागेल. म्हणजे सबसिडी पूर्णपणे काढून टाकणे नव्हे, तर ती थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, गरजेनुसार मर्यादित करणे आणि कालांतराने तिचा आवाका कमी करणे. उदाहरणार्थ, अन्नधान्याच्या बाबतीत थेट रोख हस्तांतरणाचा पर्याय विचारात घेता येऊ शकतो. खतांच्या बाबतीत सर्व पोषक घटकांना समान न्याय देणारी सबसिडी रचना आवश्यक आहे. या निर्णयांना राजकीय धैर्य लागते, हे खरे. कारण सबसिडी हा मतदारांशी थेट जोडलेला विषय आहे. पण अर्थशास्त्र आणि राजकारण यांचा समतोल साधल्याशिवाय दीर्घकालीन विकास शक्य नाही.

शेवटी प्रश्न इतकाच आहे की, सरकारला सुधारणा कागदावर हव्या आहेत की वास्तवात? जर 'रिफॉर्म ड्राइव्ह' खरोखर यशस्वी करायची असेल, तर कृषी सबसिडीच्या गाभ्यात हात घालावा लागेल. अन्यथा वाढीचे आकडे चमकदार दिसतील, पण त्यामागे असलेली शेती व्यवस्था मात्र कमकुवतच राहील. आणि अशा कमकुवत पायावर उभ्या असलेल्या अर्थव्यवस्थेचा वेग फार काळ टिकत नाही, हे इतिहासाने वारंवार दाखवून दिले आहे.

# न्यायालयीन सुधारणांसाठी याचिका नको

## सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिकाकर्त्याला फटकारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** न्यायालयीन सुधारणा सुचवणाऱ्या एका जनहित याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट नकार दिला आणि याचिकाकर्त्याला चांगलेच फटकारले. याचिकाकर्त्याने हिंदी भाषेत आपली बाजू मांडली असता, सरन्यायाधीशांनीही हिंदीतच त्यांना समजावून सांगितले. देशाच्या न्यायव्यवस्थेत बदल अपेक्षित असतील, तर त्यासाठी जनहित याचिका दाखल करण्याची आवश्यकता नसून थेट पत्र लिहून सूचना पाठवता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

याचिका दाखल करण्यापूर्वी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे, असा सल्ला देताना न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी दाखल करण्यात येणाऱ्या याचिकांमुळे न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया जातो. न्यायालयीन प्रक्रिया ही केवळ आदेश देण्यापुरती मर्यादित नसून त्यामध्ये तपास यंत्रणांचीही महत्त्वाची भूमिका असते, हे याचिकाकर्त्यांनी समजून घेतले पाहिजे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

तुम्ही प्रत्येक प्रकरण ठरावीक वेळेत निकाली काढण्याची मागणी करत आहात, पण तपास यंत्रणा, पोलिस आणि न्यायालय यांच्या भूमिका वेगवेगळ्या असतात, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. तपासाच्या कामात न्यायालय थेट हस्तक्षेप करू शकत नाही. दररोज संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना फोन करून तपासाची विचारणा करणे शक्य नसते, हे वास्तवही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

प्रत्येक न्यायालयाने एका वर्षाच्या आत निकाल द्यावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. यावर प्रतिक्रिया देताना न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, अशी मागणी करताना देशात किती न्यायालये आहेत, त्यांच्यावर किती प्रकरणांचा ताण आहे आणि त्यासाठी किती अतिरिक्त न्यायालये व न्यायाधीशांची गरज भासेल, याचा विचार केला पाहिजे. केवळ सैद्धांतिक मागण्या करून न्यायव्यवस्थेतील गुंतागुंत सुटत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जर याचिका केवळ प्रसिद्धीसाठी दाखल केली असेल, तर लॉनमध्ये कॅमेरामनसाठी अशा याचिका दाखल करू नका, असा थेट इशाराही सरन्यायाधीशांनी दिला. सध्या अनेक लोक केवळ चर्चेत राहण्यासाठी किंवा माध्यमांचे लक्ष वेधून घेण्यासाठी जनहित याचिकांचा वापर करत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

या प्रकरणात न्यायालयीन सुधारणांसाठी समिती स्थापन करावी, तसेच सर्व प्रकरणे १२ महिन्यांत निकाली काढावीत, अशा मागण्या याचिकेत करण्यात आल्या होत्या. मात्र, अशा सूचना न्यायालयात याचिकेद्वारे मांडण्याऐवजी थेट पत्राद्वारे पाठवता येतात, असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्ट केले. केवळ सुधारणा सुचवण्यासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावू नका, न्यायालयाचा वेळ वाया घालवू नका आणि तुमचाही वेळ वाया जाणार नाही, असा सल्ला देत सरन्यायाधीशांनी सुनावणीस नकार दिला.

# महापालिका पराभवानंतर अजित पवार गट सक्रिय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महापालिका निवडणुकांतील पराभवानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तात्काळ आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या तयारीला गती दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पुढील टप्प्यात आपली ताकद पुन्हा सिद्ध करण्याच्या दृष्टीने अजित पवार गटाने हालचाली वेगाने सुरू केल्याचे चित्र आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज पुण्यातील बारामती हॉस्टेल येथे अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत जिल्हा परिषद निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात आल्या. आगामी निवडणुकांसाठी उमेदवारांची चाचपणी, संघटनात्मक ताकद आणि स्थानिक पातळीवरील प्रभाव यांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचीही या बैठकीला उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे या बैठकीचे राजकीय महत्त्व अधिकच वाढले.

राज्यातील राजकारणात सध्या 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का?' या चर्चांना उधाण आले असताना, त्या चर्चांपेक्षा पुढे जात अजित पवार गटाने स्वतंत्रपणे निवडणूक तयारीला सुरुवात केल्याचे स्पष्ट संकेत या बैठकीतून मिळाले आहेत. संघटन मजबूत करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद निवडणुकांकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या बैठकीत आगामी रणनीतीबाबतही महत्त्वाच्या चर्चा झाल्या. येत्या जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये युवा नेतृत्वाला संधी देण्याचा फॉर्म्युला अजित पवार यांची राष्ट्रवादी स्वीकारण्याची दाट शक्यता आहे.

# रुपाली पाटील ठोंबरे आक्रमक ट्रोलर्सना दिला कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अ‍ॅड. रुपाली पाटील ठोंबरे यांचा पराभव झाला. त्यांनी प्रभाग क्रमांक २५ आणि २६ या दोन प्रभागांतून राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवली होती. मात्र दोन्ही प्रभागांत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. मतमोजणीच्या वेळी निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेत त्यांनी गोंधळ घातल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका सुरू झाली.

या पार्श्वभूमीवर आता रुपाली पाटील ठोंबरे यांनी सोशल मीडिया अकाऊंटवरून एक पोस्ट शेअर करत ट्रोलर्सना थेट इशारा दिला आहे. माझ्या संदर्भात जाणीवपूर्वक, हेतुपरस्पर फेक नॅरेटिव्ह, बदनामीकारक पोस्ट आणि अश्लील कमेंट करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. सोशल मीडियावरील बंधु-भगिनी, ज्येष्ठ नागरिक, तसेच पोर्टल आणि न्यूज चॅनल चालकांना उद्देशून त्यांनी ही भूमिका मांडली आहे.

वैचारिक मतभेद असू शकतात, मात्र माहिती घेऊन, तपासून आणि खात्री करूनच व्यक्त व्हावे किंवा पोस्ट करावी, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करून दुसऱ्याची बदनामी करणे किंवा अश्लील टिप्पणी करणे चुकीचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# पराभवानंतर वसंत मोरे यांची सूचक पोस्ट 'परिणाम तर भोगावे लागतील' म्हणत इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील राजकारणात वसंत मोरे हे नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी असतात. कधी आक्रमक वक्तव्यांमुळे, कधी आंदोलनांमुळे, तर कधी सोशल मीडियावरील पोस्टमुळे ते लक्ष वेधून घेतात. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत त्यांना पराभवाचा धक्का बसला असला, तरी निकालानंतर त्यांनी केलेल्या सोशल मीडिया पोस्टमुळे पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर वसंत मोरे यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर एक भावनिक आणि सूचक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी "कात्रजच्या जनतेने त्यांना जमिनीवर आणलं" असे म्हणत थेट उल्लेख केला आहे. तसेच "परिणाम तर भोगावे लागतील ना..." असे विधान करत त्यांनी एक प्रकारचा इशाराच दिल्याची चर्चा सुरू झाली आहे. या शब्दांतून मोरे नेमके कुणावर निशाणा साधत आहेत, याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.

आपल्या पोस्टमध्ये वसंत मोरे यांनी गेल्या काही वर्षांतील स्वतःच्या राजकीय प्रवासावरही भाष्य केले आहे. "चार वर्ष पुणे शहरात कोणतेही पद नसताना, २०२२ ते २०२६ या काळात गरीब मायबाप जनतेचा आधार बनून उभा राहिलो," असे त्यांनी नमूद केले आहे. पद किंवा सत्ता नसतानाही आपण सर्वसामान्य, पीडित आणि शोषित जनतेसाठी काम केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

मोरे यांनी पुढे असेही म्हटले आहे की, "आता तर २० हजार ८६७ पीडित, शोषित, प्रामाणिक जनतेने आशीर्वाद दिला आहे." या आकड्याचा उल्लेख करत त्यांनी आपल्याला मिळालेल्या मतांवर समाधान व्यक्त केले असून, पराभव असूनही जनतेचा पाठिंबा आपल्यासोबत असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच वेळी "परिणाम तर भोगावे लागतील ना" या वाक्यातून त्यांनी आपले राजकीय विरोधक किंवा टीकाकारांना अप्रत्यक्षपणे इशारा दिल्याचे मानले जात आहे. या पोस्टसोबत वसंत मोरे यांनी एक व्हिडीओदेखील शेअर केला आहे. या व्हिडीओतूनही त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या असून, आगामी काळात आपली भूमिका अधिक ठाम आणि आक्रमक राहील, असे संकेत दिले आहेत. पराभवानंतरही आपण थांबणार नाही, तर जनतेच्या प्रश्नांसाठी लढा सुरूच ठेवणार, असा संदेश या व्हिडीओतून देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

# महापौरपदासाठी भोसरी-चिंचवड गटात रस्सीखेच

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत मिळवत एकहाती सत्ता स्थापन केली आहे. सत्ता कुणाच्या हाती जाणार हे स्पष्ट झाले असले, तरी आता महापौरपद आणि स्थायी समितीच्या सभापतीपदासाठी कोणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. भाजपामधील भोसरी आणि चिंचवड या दोन प्रमुख गटांमध्ये या पदांसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या असून, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील पडद्याआड सूत्रे हलविणाऱ्या नेत्यांचीही भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या स्थापनेपासून अनेक वर्षे भाजप विरोधी बाकावर होता. मात्र २०१७ साली भाजपाने दमदार कामगिरी करत ७७ जागा जिंकून सत्तेचा दरवाजा उघडला. त्या वेळी पालिकेतील बहुतांश नगरसेवक नवखे होते. तरीही पक्षाने नव्या चेहऱ्यांवर विश्वास टाकत त्यांना महापौरपद आणि स्थायी समितीचे सभापतीपद यांसारखी महत्त्वाची जबाबदारी दिली. २०१७ ते २०२२ या कार्यकाळात नितीन काळजे, राहुल जाधव आणि माई ढोरे यांनी महापौरपदाची धुरा सांभाळली. त्याचप्रमाणे सीमा सावळे, ममता गायकवाड, विलास मडेगिरी, संतोष लोंढे आणि ज्ञानेश्वर लांडगे यांनी स्थायी समितीच्या सभापतीपदाची जबाबदारी पार पाडली. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा भाजपाला एकहाती सत्ता मिळाल्याने, यावेळी कोणाला संधी मिळणार याची जोरदार चर्चा सुरू आहे.

निकाल जाहीर होताच नवनिर्वाचित नगरसेवकांनी पक्षांतर्गत हालचाली वाढवल्या असून, विविध गटांकडून वरिष्ठ नेत्यांकडे 'वशिला' लावण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे चित्र आहे. भोसरी गटाला महापौरपद मिळणार की चिंचवड गटाला, यावर सध्या तर्कवितर्क लढवले जात आहेत. शहरातील प्रमुख नेत्यांच्या बैठकीतच या पदांचे वाटप ठरणार असल्याचे सांगितले जात असले, तरी अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवरूनच होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, उमा खापरे आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यात सध्या अंतर्गत चर्चा सुरू आहेत. शहर पातळीवर समीकरणे जुळवली जात असली, तरी महापौरपद आणि स्थायी समितीच्या सभापतीपदाबाबत दिल्ली आणि राज्यस्तरीय नेतृत्वाचा शब्द अंतिम ठरणार आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन सत्ताधारी पक्ष स्पष्ट झाला असला, तरी अद्याप महापौरपदाचे आरक्षण जाहीर झालेले नाही. त्यामुळे महापौरपदासाठी नेमकी कोणाची संधी आहे, हे सध्या गुलदस्त्यात आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत मागील दोन वेळा सर्वसाधारण आणि सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी महापौरपद राखीव होते. यावेळी आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघणार, याकडे इच्छुकांची विशेष नजर लागली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, महापौरपदाच्या आरक्षणाची प्रक्रिया येत्या काही दिवसांत पूर्ण होणार असून २६ जानेवारीपूर्वी सोडत जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यानंतरच महापौरपदाच्या शर्यतीतील चेहरे स्पष्ट होतील. तोपर्यंत भाजपातील अंतर्गत राजकारण, गटबाजी आणि शक्तिप्रदर्शन अधिकच तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# खालापूर पोलिसांची कारवाई; प्रतिबंधित गुटखा जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** खालापूर पोलिसांनी ६३ लाख ३४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत ट्रकसह एकूण १ कोटी ३ लाख ३४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुणे-मुंबई द्रुतगतीमार्गावर प्रतिबंधित गुटखा वाहतूक केली जात असल्याची माहिती खालापूर पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार सावरोली टोलनाक्याजवळ कंटेनर क्रमांक (एमएच ४० डीसी २२६५) थांबवून तपासणी करण्यात आली. या कंटेनरमध्ये मोठ्या प्रमाणात सुगंधित पान मसाला व तंबाखूयुक्त गुटखा अवैधरित्या वाहून नेण्यात येत असल्याचे उघडकीस आले. तपासणीदरम्यान कंटेनरवरील सील तुटलेले आढळले. चालकाकडे मालवाहतुकीचे कोणतेही वैध कागदपत्र अथवा अधिकृत पावती नसल्याने संशय बळावला. त्यानंतर कंटेनर पोलीस ठाण्यात आणून अन्न व औषध प्रशासन विभाग, रायगड (पेण) यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. यावेळी शेख रशीद शेख रहमान (रा. शरीफ नगर, अकोला) आणि गणेश वानखेडे (रा. हरिहरपेठ, गाडगेनगर, अकोला) या दोघांना अटक करण्यात आली आहे. सोबतच ६३.३४ लाख रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा तसेच ४० लाख रुपये किमतीचा कंटेनर जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक आचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बुलेटस्वारांवर पुणे पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राईक'

**पुणे :** हडपसर परिसरात बुलेटच्या सायलेंसरमध्ये फेरफार करून फटाक्यांसारखे कर्कश आवाज काढणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात पोलिसांनी कारवाई करत धडाका दिला आहे. ससाणेनगर-काळेपडळ परिसरात भरधाव वेगाने धावणाऱ्या दोन बुलेटस्वारांना पोलिसांनी ताब्यात घेत मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. शहरातील अनेक भागांमध्ये बुलेटच्या सायलेंसरमध्ये बदल करून जाणीवपूर्वक मोठे आवाज काढण्याचे प्रकार वाढले आहेत.

### आळंदीत प्रवाशांची दीड किलोमीटर पायपीट

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील पीएमपीएमएल बस स्थानकाचे पंधरा दिवसांपूर्वी विस्तारीकरण करून ते दोन वेगवेगळ्या ठिकाणी विभागण्यात आले आहे. या प्रक्रियेत पुणे विभागातून येणाऱ्या बसेस आळंदी देहू फाटा वाय जंक्शन येथील मोकळ्या जागेत हलवण्यात आल्या आहेत. मात्र, या नवीन ठिकाणी प्रवाशांसाठी कसल्याही प्रकारच्या निवाऱ्याची अथवा प्रकाशाची सोय करण्यात आलेली नाही. यामुळे विविध भागांतून येणाऱ्या प्रवाशांना मुख्य आळंदीत जाण्यासाठी दीड किलोमीटरपर्यंत पायपीट करावी लागत आहे.

### शिक्रापूर-सणसवाडीत राष्ट्रवादीला खिंडार?

**पिंपरी :** पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महत्त्वाच्या महापालिकांवर भारतीय जनता पक्षाने एकहाती सत्ता मिळवली आहे. या विजयामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांचे मनोबल उंचावले आहे. शिक्रापूर-सणसवाडी जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेसचा एक मोठा नेता भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत मोठे फेरबदल होण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी अनेक इतर पक्षांचे पदाधिकारी भाजपच्या तंबूत शिरण्यासाठी इच्छुक आहेत.

## आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान

# कोथिंबीरीच्या बाजारभावात घसरण...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या कोथिंबीरीचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने पालेभाजी उत्पादक शेतकरी गंभीर अडचणीत सापडले आहेत. अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कोथिंबीरीचे पीक अर्ध्यावरच सोडून दिले असून, काही ठिकाणी उभे पीक काढण्याऐवजी थेट नांगरून टाकण्याची वेळ आली आहे.

तालुक्यातील अनेक शेतांमध्ये कोथिंबीरीला सफेद फुले, म्हणजेच फुलोरा आलेला दिसून येत आहे. बाजारात मागणी कमी असल्याने आणि दर अत्यंत तुटपुंजे मिळत असल्यामुळे काढणी व वाहतुकीचा खर्चही निघत नाही. त्यामुळे शेतकरी पीक काढण्यापेक्षा तसेच ठेवण्याचा किंवा नष्ट करण्याचा निर्णय घेत आहेत. परिणामी फुलोरा आल्याने कोथिंबीरीची गुणवत्ता खालावली असून बाजारमूल्य आणखी घटले आहे. कोथिंबीरीच्या लागवडीसाठी बियाणे, खत, औषधे, पाणी, मजुरी आणि वाहतूक यावर मोठा खर्च करावा लागतो. मात्र सध्याच्या बाजारभावातून हा खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांचे भांडवल अडकले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून किंवा उधारीवर पीक घेतले होते. अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे.

बाजारात कोथिंबीरीची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्याने भाव कोसळल्याचे चित्र दिसत आहे. लातूर, नागपूर, बेंगळुरू, बेळगाव, नाशिक आदी भागांतून मोठ्या प्रमाणावर कोथिंबीर बाजारात येत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळत नसल्याची तक्रार आहे. काही बाजारात तर कोथिंबीरीच्या जोड्यांना अत्यंत कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

"कोथिंबीर काढून बाजारात नेण्याचा खर्चही निघत नाही. अशा परिस्थितीत पीक सोडून देण्याशिवाय पर्याय उरलेला नाही," अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

बाजारभावातील ही घसरण आणि उत्पादन खर्चातील तफावत पाहता, पालेभाजी उत्पादक शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची गरज असल्याची भावना तालुक्यात व्यक्त होत आहे.

# जंगली प्राण्यांनी उडवली शेतकऱ्यांची झोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथील बागवस्ती व वाफगाव रस्ता डोंगर भाग,खंडोबा डोंगर भाग या परिसरात ज्वारी,बटाटा, कांदा,भूईमूग आदि पिके जोमात आली असताना वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी बांधवांची चिंता वाढली आहे.
डोंगराळ भागाची भौगोलिक रचना,दाट झाडी आणि सुरक्षित दडण मिळल्यामुळे रानडुकरे, तरस, कोल्हे, हरणे या प्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून हे प्राणी टोळ्यांनी येऊन शेतात धुडगूस घालत आहेत.
मे महिन्यापासून चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी योग्य अंदाज घेऊन पिकांची लागवड व पेरणी केली आहे. सध्या ही पिके जोमात आली आहेत. मात्र, रानटी प्राणी सतत शेतात घुसून ज्वारी, बटाटा, कांदा, भूईमूग पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत असून उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे. पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करून पहात आहेत. शेतमालाचे उतरलेले बाजारभाव यामुळे शेतकरी बांधव आर्थिक संकटात सापडला आहे. आणि त्यातच रानटी प्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे ही समस्या अधिकच तीव्र झाली आहे.
या परिस्थितीत वन विभागाने तातडीने लक्ष घालून रानटी प्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी येथील प्रगतशील शेतकरी व पोलिस पाटील संदिप आढाव, बाळासाहेब आढाव, दताात्रय वाघोले यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. या मागणीचा वनविभागाने विचार करावा, अशी मागणी आहे.

# मंचरमध्ये महावितरणची मनमानी

## भारनियमनामुळे नागरिक, शेतकरी आणि व्यापारी त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** एकीकडे बिबट्या आणि तरसांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असताना, दुसरीकडे सतत बदलणारे हवामान आणि वारंवार होणारे विजेचे भारनियमन यामुळे मंचर शहरातील नागरिक, शेतकरी आणि व्यापारी अक्षरशः हैराण झाले आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

मंचर शहर झपाट्याने विस्तारत असून येथे उद्योग, व्यवसाय मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. तालुक्याची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेल्या मंचरमध्ये सोन्या-चांदीची प्रसिद्ध बाजारपेठ, तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीमुळे तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांची सतत वर्दळ असते. छोटे-मोठे व्यवसाय चांगल्या प्रकारे सुरू असतानाच, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा ही शहरासाठी गंभीर समस्या बनली आहे.

विशेषतः दर गुरुवारी दुरुस्तीच्या नावाखाली दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवला जातो. दर गुरुवारी नेमकी कोणती दुरुस्ती केली जाते, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ज्या भागात प्रत्यक्षात दुरुस्तीचे काम सुरू आहे, तेथेच वीजपुरवठा बंद ठेवून उर्वरित भागात वीज सुरू ठेवता येऊ शकते. मात्र प्रत्यक्षात संपूर्ण शहरात सरसकट वीज गुल केली जाते.

मागील गुरुवारी सकाळी दहा वाजता खंडित झालेला वीजपुरवठा सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुरू झाला नव्हता. या कालावधीत अनेक व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. बॅटरी बॅकअप संपल्याने दुकाने, वर्कशॉप्स आणि इतर व्यवसाय ठप्प झाले होते. त्यामुळे आर्थिक फटका बसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. गुरुवारच नव्हे, तर आठवड्यातील इतर दिवशीही वीजपुरवठा वारंवार खंडित केला जातो. विशेष म्हणजे याबाबत कोणतीही पूर्वकल्पना दिली जात नाही. पूर्वी वीज वितरण कंपनीकडून मेसेजद्वारे सूचना दिली जात होती, मात्र आता ती पद्धतही बंद झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अचानक वीज बंद झाल्याने दैनंदिन कामकाज विस्कळीत होत आहे. याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या कांदा लागवडीची तयारी अंतिम टप्प्यात असून, शेतकरी मोठ्या प्रमाणावर मजूर उपलब्ध करून घेत आहेत. लागवडीच्या काळातच वीजपुरवठा खंडित होत असल्याने सिंचनावर परिणाम होत आहे. कांदा लागवड खोळंबत असून, त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे.

नागरिकांचा सवाल आहे की, वीजबिल थकले की तात्काळ दंड आकारला जातो, मग आम्हाला नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा का दिला जात नाही? अशी भावना आता सर्वसामान्यांमध्ये तीव्र होत असून, वीज वितरण कंपनीने याबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी मंचरकरांकडून होत आहे.

# मंचर-राजगुरुनगर मार्गावरील अर्थचक्र ठप्प

## भाविकांअभावी भीमाशंकर परिसरात शुकशुकाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर जीर्णोद्धार व भाविकांसाठी सुविधा उभारणीच्या कामासाठी बंद ठेवल्याने परिसरात पूर्ण शुकशुकाट पसरला आहे. मंदिर बंद असल्याने मंचर ते भीमाशंकर आणि राजगुरुनगर ते भीमाशंकर या दोन्ही मार्गांवरील व्यावसायिकांचे अर्थकारण ठप्प झाले असून हॉटेल व्यवसाय, वाहतूक, पूजा साहित्य विक्री तसेच स्थानिक आदिवासींच्या उपजीविकेवर मोठा परिणाम झाला आहे.

भीमाशंकर येथे दरमहा सरासरी दोन लाखांहून अधिक भाविक दर्शनासाठी येत असत. या भाविकांवर अवलंबून असलेल्या सुमारे २५ हॉटेल्समध्ये पूर्वी ऑनलाइन बुकिंग सतत सुरू असे. मात्र सध्या हॉटेल्स पूर्णतः रिकामी असून कर्मचाऱ्यांची कपात करण्याची वेळ आल्याचे हॉटेल व्यावसायिकांनी सांगितले. उत्पन्न बंद झाल्याने बँक व पतसंस्थांचे हप्ते कसे भरायचे, हा गंभीर प्रश्न व्यावसायिकांसमोर उभा ठाकला आहे.

मंचर व राजगुरुनगर मार्गांवरून भाविकांच्या वाहतुकीसाठी १०० हून अधिक खासगी वाहने खरेदी करण्यात आली होती. अनेकांनी कर्ज काढून वाहने घेतली होती. मात्र भाविकांचा ओघ थांबल्याने वाहनधारकांचीही मोठी आर्थिक कोंडी झाली आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या पुणे व मुंबईहून भीमाशंकरसाठी दररोज सुमारे ४० फेऱ्या होत असत. सध्या त्यापैकी तब्बल ३० फेऱ्या बंद करण्यात आल्या असून केवळ स्थानिक प्रवाशांसाठी मर्यादित वाहतूक सुरू असल्याची माहिती मंचर बसस्थानकातून देण्यात आली.

मंदिर परिसरात हार-फुले, पूजेचे साहित्य, प्रसाद विक्री करणारे सुमारे ४० दुकानदारांनी दुकाने बंद ठेवणे पसंत केले आहे. तसेच मध, तांदूळ, आयुर्वेदिक औषधे, रानभाज्या व स्थानिक उत्पादनांवर आधारित पदार्थ विक्रीवरही मोठा परिणाम झाला आहे, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली.

दरम्यान, २०२७ मध्ये नाशिक येथील त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यानिमित्त भीमाशंकर येथे होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन राज्य शासनाने २८८ कोटी रुपयांचा भीमाशंकर परिसर विकास आराखडा मंजूर केला आहे. यामध्ये ११० कोटी रुपयांतून वाहनतळ, स्वच्छतागृहे, निवारा शेड, पिण्याचे पाणी, पोलिस कक्ष व आरोग्य सुविधा उभारण्यात येणार आहेत. मंदिर परिसर व पायऱ्यांची कामे वेगाने सुरू असल्याचे देवस्थान ट्रस्टने स्पष्ट केले आहे.

सध्या भाविकांची गैरसोय होत असली तरी भविष्यात उत्तम सुविधा उपलब्ध होतील, त्यामुळे भाविकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासन व स्थानिक प्रतिनिधींनी केले आहे.

मंदिरात सध्या केवळ पुजारी व सेवकांकडून दररोज तीन वेळा पूजा केली जात असून परिसरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# आंबेगावातील पारगाव येथे बिबट्या जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव गावाच्या हद्दीतील ढोबळे मळ्यात बिबट्या जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले आहे. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ऊसतोड कामगार, शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर वन विभागाने तातडीने उपाययोजना करत सुमारे पंधरा दिवसांपूर्वी ढोबळे मळा परिसरात पिंजरा लावला होता.

प्रारंभी लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला नाही. मात्र बिबट्याच्या हालचालींचा सखोल अभ्यास करून वन विभागाने पिंजऱ्याची जागा बदलली. त्यानंतर दत्तात्रय रघुनाथ ढोबळे यांच्या शेतात पिंजरा लावण्यात आला. अखेर या पिंजऱ्यात



बिबट्या जेरबंद झाला असून वन विभागाच्या प्रयत्नांना यश आले आहे.

वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार जेरबंद झालेला बिबट हा एक ते दीड वर्षांचा मादी बिबट असल्याचे सांगण्यात आले आहे. बिबट्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन पुढील तपासणी व आवश्यक उपचारांसाठी वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. यानंतर त्याला जुन्नर तालुक्यातील माणिकडोह निवारा केंद्रात हलविण्यात येणार असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी सांगितले.

दरम्यान एक बिबट्या जेरबंद झाला असला तरी ढोबळे मळा व आसपासच्या परिसरात अजूनही बिबट्याचा वावर असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी सतर्क राहावे, रात्रीच्या वेळी शेतात किंवा उसाच्या शेताजवळ एकटे जाणे टाळावे, तसेच लहान मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन वन परिमंडल अधिकारी नीलम चव्हाण, वनरक्षक पूजा कांबळे यांनी केले आहे.

बिबट्या जेरबंद झाल्यामुळे पारगाव व परिसरातील नागरिकांनी काहीसा दिलासा व्यक्त केला असून वन विभागाच्या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे. तथापि, संपूर्ण परिसर सुरक्षित होईपर्यंत वन विभागाकडून या भागात पिंजरा लावावा. अशी मागणी माजी उपसरपंच राजू ढोबळे यांनी केली आहे.

# ध्येय निश्चित करा, यश नक्की येईल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आपल्या जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांनी परिस्थिती कितीही कठीण असली तरी ध्येय पक्के असेल, मेहनत प्रामाणिक असेल आणि आत्मविश्वास असेल, तर शंभर टक्के यश नक्की मिळेल, असे प्रतिपादन भारतीय नौसेनेत तब्बल तीस वर्षे देशसेवा बजावलेले निवृत्त नेव्ही अधिकारी लेफ्टनंट तुळशीराम देवराम आदक यांनी केले.

वडगावपीर येथील प्रगती विद्यालयात माजी विद्यार्थी संघ व विद्यालयाने आयोजीत केलेल्या इयत्ता १० वी व १२ वी नंतर पुढे काय? व सैन्य दलातील उज्ज्वल संधी या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आदक बोलत होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील स्वप्नांना योग्य दिशा मिळावी, त्यांच्या मनातील संभ्रम दूर व्हावा आणि भविष्यासाठी आत्मविश्वासाने पहिले पाऊल टाकता यावे या उदात्त हेतूने माजी विद्यार्थी संघ वडगावपीर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी मुख्याध्यापिका उज्वला भालेराव, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विश्वनाथ साबळे, माजी उपसरपंच रविंद्र गुळवे, रविंद्र भालेराव, यश आदक, सुवर्णा आदक, मंजूळा आदक सर्व शिक्षक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# वळती ते रांजणी रस्त्याची दुरवस्था

## वाहन चालकांसमोर अडचणींचा सामना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला वळती ते रांजणी हा मुख्य रस्ता सध्या अक्षरशः जीवघेण्या अवस्थेत पोहोचला आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खोल खड्डे पडले असून अनेक ठिकाणी डांबर पूर्णपणे निघून जाऊन खडी उघडी पडली आहे. परिणामी दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.
विशेष म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या साईड पट्ट्या उखडून गेल्या असून रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात हे खड्डे व कडे ओळखणे कठीण होत असल्याने अपघाताचा धोका प्रचंड वाढला आहे. शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, कामगार, दूध संकलन वाहने या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात ये-जा करतात.



स्थानिक नागरिकांच्या मते, या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनांचे सस्पेन्शन, टायर व इतर भागांचे नुकसान होत आहे. दुचाकी घसरून किरकोळ अपघात घडत असल्याचे प्रकारही वाढले आहेत. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे प्रवासाचा वेळ वाढला असून मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे.
या रस्त्याची अवस्था अनेक महिन्यांपासून अशीच असून सार्वजनिक बांधकाम विभागाने मात्र याकडे साफ दुर्लक्ष केले आहे, अशी तीव्र नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. तात्पुरत्या स्वरूपातही खड्डे बुजविण्याचे काम झालेले नाही. यामुळे "अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?" असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

## आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा विस्तार

# रुग्णालयांची संख्या २०६ वर, हजारो रुग्णांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचारांची व्याप्ती वाढविण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे जिल्ह्यात या योजनांमध्ये समाविष्ट रुग्णालयांची संख्या ६८ वरून थेट २०६ इतकी करण्यात आली असून, गेल्या एक वर्षात सुमारे ४२ हजार रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. हृदयविकारावरील उपचार, शस्त्रक्रिया तसेच अस्थिरोग शस्त्रक्रियांचे प्रमाण यामध्ये सर्वाधिक असल्याची माहिती समोर आली आहे.

आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून प्रत्येक कुटुंबासाठी पाच लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा देण्यात येतो. आतापर्यंत या योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्न मर्यादा आणि रेशन कार्डची अट होती. मात्र, नव्या निर्णयानुसार ही मर्यादा हटविण्यात आली असून, आता पुणे जिल्ह्यातील कोणत्याही उत्पन्न गटातील नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यास रुग्णांना पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार पूर्णपणे मोफत मिळणार आहेत. योजनेच्या विस्तारानंतर जिल्ह्यातील सरकारी तसेच खासगी रुग्णालयांचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी फक्त ६८ रुग्णालये या योजनेत होती, मात्र आता ही संख्या २०६ पर्यंत वाढली आहे. या योजनेंतर्गत एकूण १,३५६ प्रकारचे उपचार आणि शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे महागड्या उपचारांसाठी खासगी रुग्णालयात जाणे परवडत नसलेल्या सर्वसामान्य रुग्णांना मोठा आधार मिळत आहे. गेल्या वर्षभरातील आकडेवारीनुसार, या योजनेतून लाभ घेतलेल्या रुग्णांमध्ये हृदयविकारावरील उपचार आणि अँजिओप्लास्टी, बायपास शस्त्रक्रिया यांचे प्रमाण अधिक आहे. त्याचबरोबर गुडघा प्रत्यारोपण, कूल्हा प्रत्यारोपण यांसारख्या अस्थिरोग शस्त्रक्रियांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. यामुळे आर्थिक अडचणीमुळे उपचार टाळणाऱ्या रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळू लागली आहे. आयुष्मान कार्ड वाटपाच्या उद्दिष्टाबाबत प्रगती झालेली नाही. पुणे जिल्ह्यात कार्ड वाटपासाठी एकूण ६६ लाख ४८ हजार ५९५ लाभार्थींचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत केवळ १९ लाख ४६ हजार नागरिकांना, म्हणजेच सुमारे २९ टक्के लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्डचे वितरण झाले आहे. उर्वरित ४७ लाख २ हजार नागरिक, म्हणजेच ७१ टक्के उद्दिष्ट अद्याप अपूर्ण आहे. तज्ज्ञांच्या मते, रुग्णालयांचा समावेश आणि उपचारांची संख्या वाढविणे हा महत्त्वाचा निर्णय असला, तरी कार्ड वाटप मोहिमेला गती देणे तितकेच आवश्यक आहे. नागरिकांकडे आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध झाल्यास या योजनांचा लाभ व्यापक प्रमाणावर पोहोचू शकतो. प्रशासनाने यासाठी विशेष मोहिमा राबवण्याची गरज आहे.

# आमोंडीत विधवांना सन्मान देणारा 'हेरवाड पॅटर्न'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** आमोंडी येथे विधवांना सन्मान देणारा 'हेरवाड पॅटर्न' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

समाजातील जुनाट रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांना छेद देत विधवा महिलांना समान सन्मान मिळावा, या उद्देशाने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. यापुढे विधवांनी मंगळसूत्र, बांगड्या उतरवाव्यात, हळदीकुंकवापासून दूर राहावे, अशा बंधनांना आमोंडी गावात स्पष्ट नकार देण्यात आला आहे. कोल्हापूरातील हेरवाड गावाने सुरू केलेल्या या पॅटर्नला राज्य सरकार आणि केंद्र सरकारचे पाठबळ मिळाले आहे. त्याच प्रेरणेतून आंबेगाव तालुक्यातील आमोंडी गावाने हा निर्णय स्वीकारला आहे. यशवर्धिनी ग्रामीण महिला स्वयंसिद्ध संघाच्या माध्यमातून महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी विधवा महिलांच्या सन्मानासाठी जनजागृतीची चळवळ उभी केली आहे. प्रयत्नशील महिला स्वयंसहाय्यता बचत गट विभागाच्या पुढाकाराने आमोंडी येथे विधवा महिला सन्मान कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ठराव मंजूर करण्यात आला.

## सारांश वृत्त

### बुक्सा राखीव जंगलात वाघ दिसला

**कोलकाता :** अलिपुरद्वार जिल्ह्यातील बक्सा राखीव वन क्षेत्रात रॉयल बंगाल वाघ आढळल्यानंतर, वन विभाग कस्टमाइज्ड एम-स्ट्राइप्स (वाघांसाठी देखरेख प्रणाली - सघन संरक्षण आणि पर्यावरणीय स्थिती) वापरत आहे की २०२३ पासून या पट्ट्यात आढळणारा हा वाघ तिसरा आहे का हे निश्चित करण्यासाठी. २०२५-२६ व्याघ्र अंदाज चक्राचा भाग म्हणून बुक्सा व्याघ्र प्रकल्पात २५० हून अधिक कॅमेरा ट्रॅप बसवून सुरू झालेल्या अखिल भारतीय व्याघ्र अंदाज सरावात जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात हा वाघ कॅमेऱ्यात दिसला, असे वन विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### औषधी वनस्पतींच्या लागवडीला प्रोत्साहन

**शिमला :** हिमाचल प्रदेश सरकारने सोमवारी भारतीय सैन्य आणि झाशी येथील श्री वैद्यनाथ आयुर्वेद यांच्यासोबत राज्यातील निवडक सीमावर्ती आणि दुर्गम गावांमध्ये औषधी आणि सुगंधी वनस्पतींच्या मोठ्या प्रमाणात लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी त्रिपक्षीय सामंजस्य करार (एमओयू) केला. या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू म्हणाले की, पारंपारिक आयुर्वेदिक पद्धतींचे पुनरुज्जीवन आणि प्रचार करण्यात आणि शाश्वत ग्रामीण उपजीविका निर्माण करण्यात सहयोगी चौकट महत्त्वाची भूमिका बजावेल.




### मंत्री तिम्मापूर यांच्याविरुद्ध तक्रार

**बेंगळुरू :** कर्नाटक लोकायुक्तांना राज्यमंत्री आर.बी. तिम्मापूर यांच्याविरुद्ध उत्पादन शुल्क लाचखोरी घोटाळ्यात सहभागी असल्याच्या आरोपावरून औपचारिक तक्रार मिळाली आहे. २५ लाख रुपयांची लाच घेताना अलिकडेच वरिष्ठ उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना अटक करण्यात आल्याने ही घटना घडली आहे. रविवारी मंत्र्यांनी आरोप फेटाळून लावले.

## काँग्रेसचा भाजपवर गंभीर आरोप

# राजस्थानमध्ये नावे वगळण्याचा कट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राजस्थानमध्ये भाजपविरोधी मतदारांची नावे मतदार यादीतून फसव्या पद्धतीने वगळण्याचा कट रचला जात असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने सोमवारी केला. राज्यात लोकशाहीची हत्या होऊ देणार नाही, असा इशाराही काँग्रेसने दिला आहे.

राजस्थान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गोविंद सिंग दोतासरा यांनी सांगितले की, विशेष सघन सुधारणा (एसआयआर) प्रक्रियेनंतर प्रसिद्ध झालेल्या मसुदा मतदार यादीत तब्बल ४५ लाख मतदार 'अनुपस्थित, स्थलांतरित किंवा मृत' असल्याचे दाखवण्यात आले. या यादीवर १५ जानेवारीपर्यंत हरकती मागवण्यात आल्या होत्या.

३ जानेवारीपर्यंत कोणताही गोंधळ नव्हता आणि संपूर्ण प्रक्रिया सुरळीत सुरू होती. मात्र



३ जानेवारी रोजी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस (संघटना) बी. एल. संतोष यांनी राजस्थानला भेट दिल्यानंतर परिस्थिती बदलली आणि बनावट पद्धतीने नावे जोडण्यास तसेच काढून टाकण्यास सुरुवात झाली, असा आरोप दोतासरा यांनी राजस्थान विधानसभेतील विरोधी पक्षनेते टिकाराम जुली यांच्यासह घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला.

निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवरील आकडेवारीचा हवाला देत दोतासरा म्हणाले की, १७ डिसेंबर ते १४ जानेवारी या कालावधीत भाजपच्या ९३७ बूथ-स्तरीय एजंट्समार्फत २११ नावे जोडण्यासाठी आणि ५,६९४ नावे वगळण्यासाठी अर्ज करण्यात आले. याउलट काँग्रेसकडून केवळ ११० एजंट्समार्फत १८५ नावे जोडण्यासाठी आणि दोन नावे वगळण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आले.

दरम्यान, निवडणूक आयोगाने गोवा, लक्षद्वीप, राजस्थान, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेतील प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्याची अंतिम तारीख १९ जानेवारीपर्यंत वाढवली आहे. यापूर्वी ही मुदत १५ जानेवारीपर्यंत होती. ज्यांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत, त्यांना आता १९ जानेवारीपर्यंत दावा दाखल करता येणार आहे.

या मुदतवाढीवरही काँग्रेसने संशय व्यक्त केला आहे. भाजप आणि निवडणूक आयोग संगनमत करून काँग्रेस विचारसरणीशी संबंधित मतदारांची नावे वगळण्यासाठीच अंतिम मुदत वाढवत असल्याचा आरोप दोतासरा यांनी केला.

काही मतदारसंघांमध्ये एका दिवसात मोठ्या प्रमाणावर फॉर्म ७ अर्ज प्राप्त झाल्याचा दावाही त्यांनी केला. झुंझुनूमध्ये एका दिवसात १३,८८२ अर्ज, मांडवामध्ये १६,२७६, उदयपूरवटीमध्ये १,२४१ आणि खेत्रीमध्ये १,४७८ अर्ज दाखल झाल्याचे त्यांनी सांगितले. आतापर्यंत एकूण १.४० लाख फॉर्म नोंदणीकृत झाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

गृहमंत्री अमित शहा १३ जानेवारी रोजी राजस्थान दौऱ्यावर आले होते आणि ३ ते १३ जानेवारीदरम्यान राज्यात एक 'गुप्त ऑपरेशन' राबवण्यात आल्याचा आरोपही दोतासरा यांनी केला. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात हजारो बनावट संगणकीकृत फॉर्म छापून, विशेषतः काँग्रेसने जिंकलेल्या मतदारसंघांना लक्ष्य करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले.

नियमांनुसार बूथ लेव्हल ऑफिसरला दररोज केवळ १० फॉर्म वितरित करण्याची परवानगी असताना, बनावट स्वाक्षऱ्यांसह हजारो फॉर्म सादर करण्यात आल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे. त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघात ६२७ फॉर्म स्वीकारण्यात आले, मात्र आणखी २,००० फॉर्म स्वीकारण्यास उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी नकार दिला, असे दोतासरा यांनी सांगितले.

कोणतेही वैध मत वगळले जाऊ नये, यासाठी काँग्रेसने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथ-स्तरीय एजंटना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. राजस्थानमध्ये लोकशाहीची गळचेपी होऊ देणार नाही, असा ठाम निर्धारही काँग्रेस नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

## काझीरंगात तीन वाघांचा संशयास्पद मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** आसाममधील काझीरंगा राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्पात गेल्या पंधरा दिवसांत घडलेल्या घटनांनी वन्यजीव संवर्धन यंत्रणांची चिंता वाढवली आहे. संशयास्पद अंतर्गत संघर्षामुळे तीन रॉयल बंगाल वाघांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

ताज्या घटनेत रविवारी दुपारी सुमारे चार वाजता एका मादी वाघिणीचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मानक कार्यपद्धतीनुसार शवविच्छेदन आणि मृतदेहाच्या विल्हेवाटीसाठी काझीरंगा राष्ट्रीय उद्यान आणि व्याघ्र प्रकल्पाच्या संचालकांनी विशेष समिती स्थापन केली आहे, अशी माहिती उद्यान प्रशासनाने सोमवारी जारी केलेल्या निवेदनात दिली.

प्राथमिक शवविच्छेदन अहवालानुसार या वाघिणीचा मृत्यू अंतर्गत भांडणामुळे झाल्याचे संकेत मिळत आहेत.

याआधी ४ जानेवारी रोजी आणखी एका मादी वाघिणीचा मृतदेह आढळला होता. त्या प्रकरणातही शवविच्छेदनाच्या प्राथमिक निष्कर्षांवरून अंतर्गत संघर्षामुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले होते. यानंतर १४ जानेवारी रोजी काझीरंगा व्याघ्र प्रकल्पाच्या विश्वनाथ वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या गमिरीच्या पूर्व रेंजमधील थुटे चापोरी परिसरात एका तरुण नर वाघाचा मृतदेह सापडला. प्राथमिक तपासणीत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी हा मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे किंवा वाघांमधील अंतर्गत भांडणातून झाला असावा, असा अंदाज व्यक्त आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यान हे रॉयल बंगाल वाघांसाठी अत्यंत महत्त्वाचे अधिवास मानले जाते. २०२४ च्या अंदाजानुसार या उद्यानात एकूण १४८ वाघ आहेत. त्यामुळे अल्प कालावधीत तीन वाघांचा मृत्यू होणे ही बाब संवर्धनाच्या दृष्टीने गंभीर मानली जात आहे. वाघांच्या मृत्यूच्या घटनांमुळे काझीरंगातील आव्हाने केंद्रस्थानी आली आहेत.

## इंडिगोला आकारलेला दंड तुटपुंजाच

### देशभरातील जनतेची तसेच पायलट संघटनेची भावना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या मोठ्या प्रमाणात उड्डाण विस्कळीत झाल्याबद्दल नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने भारतातील सर्वात मोठी देशांतर्गत विमान कंपनी इंडिगोवर २२.२ कोटी रुपयांचा दंड आकारला आहे, जो देशातील आघाडीच्या पायलट संघटनेला तसेच जनतेला पसंत पडला नाही.

विमान वाहतूक नियामकाने आपल्या निर्णयाचे समर्थन केले आणि म्हटले की हा कोणत्याही विमान कंपनीवर लावण्यात आलेला सर्वात मोठा दंड आहे, परंतु उच्च अधिकाऱ्यांनी कबूल केले की ही खरोखरच एक तुटपुंजी रक्कम आहे. डीजीसीएच्या चौकशी समितीने शनिवारी आपला अहवाल सार्वजनिक केला.

फेडरेशन ऑफ इंडियन पायलट्सचे अध्यक्ष कॅप्टन सीएस रंधावा यांनी सांगितले की, डीजीसीएने इंडिगोविरुद्ध कठोर कारवाई करायला हवी होती आणि इतर एअरलाइन्ससाठी त्याचे उदाहरण द्यायला हवे होते जेणेकरून भविष्यात त्यांच्यापैकी कोणीही जनतेला अशी गैरसोय करू नये. उलट, त्यांनी त्याबाबत इतके सौम्य वर्तन केले आहे. इंडिगोसाठी २२.२ कोटी रुपयांची रक्कम खूपच कमी आहे, असे त्यांनी निरीक्षण नोंदवले.

साउथवेस्ट एअरलाइन्सचे उदाहरण आठवताना कॅप्टन रंधावा म्हणाले की, २०२२ मध्ये ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या काळात २० लाख प्रवाशांच्या प्रवास योजना उध्वस्त केल्यानंतर अमेरिकन परिवहन विभागाने डिसेंबर २०२३ मध्ये एअरलाइनवर १४० दशलक्ष डॉलर्स (त्या वर्षीच्या बाजार दरानुसार ११,६२० कोटी रुपये) दंड आकारला होता. "बहुतेक रक्कम ग्राहकांच्या भरपाईसाठी होती," असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

## नक्षलवाद्यांच्या आयईडी स्फोटात तरुणाचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बिजापूर :** छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी लावलेल्या प्रेशर इम्प्रोवाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइस (आयईडी) च्या स्फोटात २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली.

पोलिस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही घटना रविवारी उसूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कस्तुरीपाद गावाजवळ घडली. गावातील रहिवासी आयता कुहरामी हा तरुण जवळच्या जंगलात गेला असताना चुकून प्रेशर आयईडीच्या संपर्कात आला. त्यानंतर झालेल्या जोरदार स्फोटात त्याच्या पायांना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत आयता कुहरामी याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

घटनेनंतर सुरक्षा दलांनी परिसरात शोधमोहीम सुरू केली असून, आसपास आणखी आयईडी लावण्यात आल्या आहेत का, याची सखोल तपासणी केली जात आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जंगलातील मार्ग आणि दुर्गम भाग तपासून सुरक्षित केले जात असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पोलिसांनी स्थानिक नागरिकांना जंगलात किंवा दुर्गम परिसरात जाताना विशेष सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही संशयास्पद वस्तू, हालचाल किंवा साहित्य आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा सुरक्षा छावणीत माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, नक्षलविरोधी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या सुरक्षा दलांना लक्ष्य करण्यासाठी माओवादी अनेकदा मातीच्या रस्त्यांवर आणि जंगलातील मार्गांवर प्रेशर आयईडी लावतात. मात्र या सापळ्यांना अनेकदा निष्पाप नागरिकही बळी पडत असल्याचे चित्र बस्तर प्रदेशात दिसून येत आहे.

बिजापूरसह सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर भागात यापूर्वीही अशा प्रकारच्या घटनांमध्ये नागरिकांचा जीव गेला आहे. ५ जानेवारी रोजी बिजापूर जिल्ह्यातच नक्षलवाद्यांनी लावलेल्या प्रेशर आयईडी स्फोटात १५ वर्षांचा मुलगा जखमी झाला होता. पोलिसांच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षभरात बस्तर प्रदेशात प्रेशर आयईडी स्फोटांसह माओवादी हिंसाचाराच्या घटनांमध्ये एकूण ४६ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांनी नक्षलप्रभावित भागात गस्त आणि शोधमोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे.

## कराची आगीतील मृतांचा आकडा वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कराची :** पाकिस्तानच्या कराची शहरातील एका जुन्या शॉपिंग मॉलमध्ये लागलेल्या भीषण आगीत मृतांचा आकडा १४ वर पोहोचला असून, ढिगाऱ्याखाली आणखी लोक अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बचाव पथकांना इमारतीच्या अवशेषांमधून आणखी आठ मृतदेह सापडल्याने ही माहिती समोर आली.

शनिवारी रात्री एम.ए. जिना रोडवरील गुल प्लाझा या घाऊक आणि किरकोळ बाजारपेठेत ही आग लागली होती. तळघर, मेझानाइन आणि आणखी तीन मजल्यांवर पसरलेल्या या इमारतीत सुमारे १२०० दुकाने होती. रविवारी रात्रीपर्यंत आग आटोक्यात आणण्यात आली.

आग लागल्यानंतर सुरुवातीला सहा मृतदेह सापडले होते. गुदमरल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले, तर डझनभर जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र आगीचा प्रचंड भडका उडाल्याने आणि धुरामुळे काही काळ बचाव पथकांना इमारतीत प्रवेश करता आला नव्हता. रेस्क्यू १२२२ चे मुख्य कार्यकारी अधिकारी आबिद जलाल यांनी सांगितले की, आग पूर्णपणे विझवल्यानंतर आणि इमारत थंड होण्याची वाट न पाहता बचाव पथकांनी आत प्रवेश केला. "अडकलेल्या लोकांचा शोध घेताना आम्हाला आणखी आठ मृतदेह सापडले. त्यापैकी काही मृतदेह गंभीररीत्या जळालेले होते," असे त्यांनी सांगितले.

सोमवारी सकाळी जलाल यांनी स्पष्ट केले की, आगीमुळे इमारतीचे जवळपास संपूर्ण नुकसान झाले आहे. कमकुवत झालेल्या खांबांमुळे इमारतीचा पुढील आणि मागील भाग कोसळला असून उर्वरित रचना देखील धोकादायक स्थितीत आहे. "इमारत आणखी कोसळण्याची शक्यता असल्याने शोधमोहीम अतिशय काळजीपूर्वक सुरू आहे," असे त्यांनी नमूद केले.

## ग्रीनलँडवरून ट्रम्प यांचा डेन्मार्कवर दबाव

# वॉशिंग्टन-कोपनहेगन तणाव तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या ग्रीनलँडवरून डेन्मार्कवर दबाव वाढवला असून, या आर्क्टिक प्रदेशातील सुरक्षेच्या मुद्द्यावर कोपनहेगन अपयशी ठरल्याचा आरोप केला आहे. "रशियन धोका" योग्यरीत्या हाताळण्यात डेन्मार्क कमी पडल्याचे सांगत वॉशिंग्टन आता थेट कारवाई करेल, असे संकेत ट्रम्प यांनी दिले आहेत.

ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये नाटोने गेल्या दोन दशकांपासून ग्रीनलँडमधील सुरक्षाविषयक आव्हानांबाबत डेन्मार्कला इशारे दिले होते, असे नमूद केले. "दुर्दैवाने डेन्मार्कने काहीही केले नाही. आता वेळ आली आहे आणि ते केले जाईल," असे त्यांनी ठामपणे म्हटले. या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर ट्रान्सअटलांटिक तणाव आणखी वाढला आहे.

ग्रीनलँडवरील डेन्मार्कच्या भूमिकेला पाठिंबा देणाऱ्या युरोपीय देशांवर नव्या आयातकरांची धमकी देत ट्रम्प यांनी दबावाचे राजकारण अधिक तीव्र केले आहे. त्यांनी १ फेब्रुवारीपासून डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड्स, नॉर्वे, स्वीडन आणि युनायटेड किंगडममधून येणाऱ्या वस्तूंवर १० टक्के कर लागू करण्याची घोषणा केली.या निर्णयामुळे ब्रुसेल्समध्ये खळबळ उडाली असून युरोपियन युनियनमध्ये आपत्कालीन सल्लामसलत सुरू झाली आहे. संभाव्य प्रतिकारात्मक उपाययोजना आणि अमेरिका-ईयू संबंधांवर होणारे दीर्घकालीन परिणाम यावर चर्चा होत आहे. युरोपियन युनियन त्यांच्या सर्वात प्रभावी व्यापार प्रतिशोध यंत्रणेचा वापर करावा का, याचा विचार करत आहे. या यंत्रणेला अनौपचारिकपणे 'ट्रेड बाझूका' म्हटले जाते. ती वापरल्यास आर्थिक दबाव आणणाऱ्या देशांविरुद्ध गुंतवणूक, सार्वजनिक खरेदीतील प्रवेश आणि बौद्धिक संपदा संरक्षणावर निर्बंध घालता येऊ शकतात. ट्रम्प पुन्हा व्हाईट हाऊसमध्ये परतल्यानंतर युरोपकडून त्यांना मिळालेली ही सर्वात तीव्र प्रतिक्रिया मानली जात आहे. गेल्या काही महिन्यांत युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर युरोपियन देशांनी ट्रम्प यांच्याशी जपून, राजनैतिक तोल राखत संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. मात्र ग्रीनलँड प्रकरणामुळे हा संयम तुटताना दिसत आहे.

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, युरोपने कठोर प्रतिसाद देण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे. ब्रुसेल्समधील बैठकीनंतर त्यांनी "युरोपियन युनियनचा 'ट्रेड बाझूका' वापरण्याची वेळ आली आहे," असे विधान केले.

आर्क्टिकमध्ये वाढत्या चिनी आणि रशियन हालचाली, तसेच अमेरिकेच्या दीर्घकालीन सुरक्षा हितसंबंधांच्या दृष्टीने ग्रीनलँडचे महत्त्व लक्षात घेऊन ट्रम्प यांनी याआधीही हा स्वायत्त प्रदेश अमेरिकेने ताब्यात घ्यावा, अशी भूमिका मांडली होती. ग्रीनलँड डेन्मार्कच्या सार्वभौमत्वाखाली असला तरी अमेरिकेला तो खरेदी करण्याची परवानगी मिळेपर्यंत युरोपीय मित्र राष्ट्रांवर कर वाढवले जातील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र डेन्मार्क आणि ग्रीनलँड या दोघांनीही हा प्रस्ताव ठामपणे फेटाळला आहे. कोपनहेगन आणि ग्रीनलँडची राजधानी नुउक येथील नेत्यांनी ग्रीनलँड विक्रीसाठी नाही आणि अमेरिकेचा भाग होण्याचा कोणताही प्रश्नच नाही, असे स्पष्ट केले आहे.

## दक्षिण चिलीमध्ये वणव्यांची भीषणता वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सँटियागो (चिली) :** दक्षिण चिलीमधील अनेक समुदायांमध्ये अनियंत्रित वणव्याने अक्षरशः थैमान घातले असून या आगीत किमान १९ जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. सँटियागोच्या दक्षिणेस सुमारे ५०० किलोमीटर अंतरावरील नुबल आणि बायोबायो या प्रदेशांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून वणवे पेटले असून त्याचा फटका मोठ्या प्रमाणावर नागरिकांना बसला आहे. आतापर्यंत ५० हजारांहून अधिक लोकांना



आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले आहे.

जोरदार वारे आणि तीव्र उष्ण हवामानामुळे आगीने अतिशय वेगाने फैलाव घेतला. अनेक ठिकाणी काही मिनिटांतच संपूर्ण वसाहती जळून खाक झाल्या. पेन्को शहरात सर्वाधिक जीवितहानी झाल्याचे महापौर रॉड्रिगो वेरा यांनी सांगितले.

पेन्को येथील २५ वर्षीय विद्यार्थी मतियास सिड यांनी आगीचा थरारक अनुभव सांगताना म्हटले की, पहाटे साडे दोनच्या सुमारास आग पूर्णपणे नियंत्रणाबाहेर गेली. आगीचे जणू एखादे वादळच आले आणि खालील भागातील घरे क्षणार्धात जळून गेली. जीव वाचवण्यासाठी अक्षरशः पळावे लागल्याचे त्यांनी सांगितले. आम्ही आणखी वीस मिनिटे थांबलो असतो तर कदाचित जिवंत राहिलो नसतो, असेही त्यांनी नमूद केले. आगीच्या तडाख्यानंतरचे दृश्य विदारक आहे. जळून गेलेली घरे, खाक झालेल्या गाड्या आणि पिक-अप ट्रक, तसेच पूर्णपणे ओस पडलेले रस्ते या साऱ्या दृश्यांनी परिसरातील भयावह वास्तव समोर आले आहे.

## डीके शिवकुमार दाओसला जाणार

**बेंगळुरू :** वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी दावोसचा अधिकृत दौरा रद्द केल्यानंतर कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी सोमवारी सांगितले की ते या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ते मंगळवारी दावोसला रवाना होण्याची शक्यता आहे. "अर्थात, दिल्लीने मला परवानगी दिली आहे, माझ्या नेत्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनीही मला तिथे जाण्यास सांगितले आहे, असे त्यांनी सांगितले.

## एसआयआर प्रकरणी 'सर्वोच्च' निर्देशांचे स्वागत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** मतदार यादीच्या विशेष सघन पुनरीक्षणादरम्यान भारतीय निवडणूक आयोग "तार्किक विसंगती" यादीत समाविष्ट असलेल्या मतदारांची नावे ग्रामपंचायत, ब्लॉक, तालुके, उपविभाग आणि वॉर्ड कार्यालयांमध्ये प्रदर्शित करू शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्यानंतर अभिषेक बॅनर्जी यांनी सोमवारी भाजपवर जोरदार हल्ला चढवला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, ही प्रक्रिया पूर्णपणे वेळेवर झाली पाहिजे आणि सर्व व्यक्तींना योग्य संधी दिली पाहिजे.

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय



सरचिटणीस अभिषेक यांनी सोमवारी दुपारी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील बारासत येथे पक्षाच्या रॅलीला संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे स्वागत केले.

"या निर्देशाने सर्वोच्च न्यायालयाने आज त्यांना अक्षरशः फटकारले आहे. मतदारांच्या यादीत तार्किक विसंगतीच्या समावेशासंदर्भात आयोगाच्या निर्णयाविरुद्ध आम्ही निषेध करत असल्याने न्यायालयाने तृणमूल काँग्रेसच्या मागणीला मान्यता दिली," असे अभिषेक म्हणाले.

## जम्मू-काश्मीरमध्ये जानेवारीत ९६ टक्के पावसाची तूट

# चिलाई कलानमध्येही पावसाचा दुष्काळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** हिवाळ्यात सर्वाधिक हिमवर्षाव होणाऱ्या चिलाई कलान काळातही जम्मू आणि काश्मीरमध्ये पावसाची कमतरता नोंदवली गेली आहे. जानेवारी २०२६ च्या पहिल्या सहामाहीत, वरच्या भागांतील तुरळक हिमवृष्टी वगळता, संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये तब्बल ९६ टक्के पावसाची तूट नोंदली गेल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे.

काश्मीर हवामान विभागाचे संचालक डॉ. मुख्तार अहमद यांनी सांगितले की, १ ते १४ जानेवारीदरम्यान अपेक्षित पावसाच्या तुलनेत अत्यंत



कमी पर्जन्यमान झाले. हवामान खात्याच्या आकडेवारीनुसार, खोऱ्यातील श्रीनगर, बडगाम आणि शोपियान तसेच जम्मू विभागातील उधमपूर, सांबा, दोडा आणि रामबन या जिल्ह्यांमध्ये या कालावधीत एक थेंबही पाऊस न पडल्याने १०० टक्के पावसाची कमतरता नोंदली गेली. खोऱ्यातील कुलगाम, पुलवामा आणि बांदीपोरा तसेच जम्मू विभागातील किश्तवाड जिल्ह्यात पावसाची तूट ९९ टक्क्यांच्या आसपास आहे. दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यात सरासरी २४.५ मिमी पावसाऐवजी केवळ १.७ मिमी पाऊस पडला असून तेथे ९३ टक्के तूट नोंदली गेली आहे. बारामुल्लामध्ये ९१ टक्के, तर कुपवाडामध्ये ९७ टक्के पावसाची तूट असून सरासरी २७.४ मिमीच्या तुलनेत केवळ ०.८ मिमी पाऊस झाला आहे. जम्मू शहरात सरासरी २०.५ मिमी पावसाऐवजी फक्त १.९ मिमी पाऊस पडल्याने ९१ टक्के तूट नोंदवण्यात आली आहे. सीमावर्ती कठुआ जिल्ह्यात ९७ टक्के, तर रियासी जिल्ह्यात ९६ टक्के पावसाची कमतरता आहे. पूंछ आणि राजौरी या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे ८.३ मिमी आणि ७.७ मिमी पाऊस पडला असून येथे सुमारे ६० टक्के तूट नोंदली गेली आहे.

याआधीही १ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२५ या कालावधीत जम्मू आणि काश्मीरमध्ये दीर्घकाळ कोरडे हवामान राहिल्याने ८६ टक्के पावसाची तूट जाणवली होती. या काळात सरासरी ४३.१ मिमी पावसाची अपेक्षा असताना प्रत्यक्षात केवळ ६.१ मिमी पाऊस झाला होता. त्या कालावधीत राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाची कमतरता नोंदली गेली होती. यंदाच्या हिवाळ्यात श्रीनगरसह मैदानी भागात चिलाई कलानमध्ये बर्फवृष्टी झालेली नाही. मात्र गुलमर्ग आणि सोनमर्गसारख्या उंचावरील पर्यटनस्थळांवर काही प्रमाणात हिमवृष्टी झाली आहे. पावसाच्या तीव्र कमतरतेमुळे खोऱ्यातील जलसाठे झपाट्याने आटत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

काश्मीर सध्या चिलाई कलानच्या कडक हिवाळ्यात असून हा कालावधी २१ डिसेंबरपासून सुरू होऊन ३१ जानेवारीला संपतो. स्थानिक रहिवासी या बदलत्या हवामानाकडे हवामान बदलाचे स्पष्ट संकेत म्हणून पाहत आहेत. श्रीनगरमधील ज्येष्ठ नागरिक अब्दुल समद यांनी सांगितले की, पूर्वी चिलाई कलानमध्ये मोठ्या प्रमाणावर बर्फवृष्टी होत असे, मात्र आता थंड रात्री आणि कोरडे, ऊन असलेले दिवस अनुभवायला मिळत आहेत.

दरम्यान, हवामान विभागाने दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे. येत्या दिवसांत पश्चिमी विक्षोभ सक्रिय होण्याची शक्यता असून किमान दोन वेळा हिमवृष्टी होऊ शकते.